**RNI No. MAHBIL /2009/40124**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ९, अंक १९(२)] शुक्रवार, जुलै २८, २०२३/श्रावण ६, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **२८ जुलै, २०२३** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. II OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE INDIAN PENAL CODE, 1860 AND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973 IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.**

**भारतीय दंड संहिता, १८६० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१८६० चा महा.४५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनाकरिता भारतीय दंड संहिता, १८६० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२२ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

(३) तो ताबडतोब अंमलात येईल.

प्रकरण दोन

**भारतीय दंड संहिता, १८६० याची सुधारणा.**

सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३५३ ची सुधारणा. **२.** भारतीय दंड संहिता, १८६०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना याच्या कलम ३५३ मध्ये "पाच वर्षेपर्यंत" या मजकुराऐवजी "दोन वर्षेपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याची सुधारणा.**

सन १९७४ चा अधिनियम क्र.२ याच्या पहिल्या अनुसूचीची सुधारणा. **३.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना तिच्या पहिल्या अनुसूचीमध्ये "एक-'भारतीय दंड संहिते' खालील अपराध" या शीर्षाखालील कलम ३५३ च्या संदर्भातील नोंदीऐवजी पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३५३.** | "लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | २ वर्षाचा कारावास किंवा द्रव्यदंड, किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामिनपात्र | दंडाधिकारी न्यायालय. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारतीय दंड संहिता, १८६० याच्या कलम ३५३ मध्ये, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करण्याच्या अपराधाबद्दल फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्या तरी एका वर्णनाच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील अशी तरतूद आहे. तसेच संबंधित अपराधांची न्याय चौकशी सत्र न्यायालयाकडून करण्यात येईल अशी तरतूद आहे. याबाबतीत असे निदर्शनास आले आहे की, या तरतुदीचा वापर लोकप्रतिनिधी व त्यांच्यासोबत माहिती संकलन करण्यासाठी गेलेले पत्रकार, माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्ते यांच्या विरोधात नोकरशाहीने वापरल्याच्या तक्रारी वाढत आहेत. लोकसेवक किंवा पत्रकारीतेतील व्यक्तींना या तरतुदींचा वापर करण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची तरतूद असणे आवश्यक आहे.

सदर गुन्ह्यासाठी असलेली शिक्षा देशांतर्गत सर्व राज्यात दोन वर्षे असताना केवळ आपल्या राज्यात पाच वर्षे शिक्षेची तरतूद असल्याने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ चा भंग होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरहू गुन्ह्याची चौकशी सत्र न्यायालयात करण्याची तरतूद असल्याने संबंधित गुन्हेगारास न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात युक्तिवाद झाल्यानंतर सत्र न्यायालयात जामीनासाठी अर्ज सादर करावा लागतो व या प्रक्रियेस किमान ७ दिवसांचा कालावधी जातो. लोकसेवकासारख्या जबाबदार व्यक्तीस नोकरशाहीकडून जाणूनबुजून त्रास देण्याच्या उद्देशाने सातत्याने आढळून येत असलेल्या या बाबीमुळे तो दीर्घकाळ जनतेला उपलब्ध होऊ शकत नाही व त्याला नाहक मनस्ताप सोसावा लागतो. अशा परिस्थितीत भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ मध्ये व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पहिल्या अनुसूचीमध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १९ जानेवारी, २०२२.

**संजय सावकारे,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २८ जुलै, २०२३.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.